# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

परीक्षा समन्वय कक्ष
परीक्षा विभाग, गणेशखिंड,
पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ :www.unipune.ac.in

Exam Co-ordination Section
Examination Department,
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


**संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/३७** **अत्यंत तातडीचे/महत्त्वाचे** **दिनांक २०.०१.२०२६**

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक
सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था
पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश

**विषय : केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाअंतर्गत मुल्यांकनाच्या कामकाजाकरिता शिक्षकांना कार्यमुक्त करणेबाबत.**

महोदय/महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, हिवाळी सत्र परीक्षा २०२५ च्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाअंतर्गत मुल्यांकनाच्या कामकाजाकरिता नियुक्त केलेले शिक्षक संबंधित कॅप सेंटरवर कामकाजाकरिता हजर होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ८९ द्वारे परीक्षांचे निकाल परीक्षेच्या अखेरच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत जाहीर करण्याची तरतूद विहित करण्यात आलेली आहे. तसेच कलम ४८(४) मध्ये परीक्षेच्या कामकाजाकरिता सहाय्य करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

***"विद्यापीठ, संलग्न, संचालित महाविद्यालये, समूह महाविद्यालये किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या प्रत्येक अध्यापकावर आणि अध्यापकेतर कर्मचाऱ्यावर, विद्यापीठाच्या परीक्षा व विद्यार्थ्यांचे मूल्यमापन यांबाबत परिनियमाद्वारे विहित केल्याप्रमाणे आवश्यक ते सहाय्य आणि सेवा देणे बंधनकारक आहे. याबाबत विद्यापीठाच्या किंवा महाविद्यालयाच्या किंवा परिसंस्थेच्या आदेशाचे अनुपालन करण्यात कोणत्याही अध्यापकाने किंवा अध्यापकेतर कर्मचाऱ्याने कसूर केल्यास, ती गैरवर्तणूक असल्याचे समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईसाठी पात्र असेल."***

तरी याबाबत सर्व महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, केंद्रीय मूल्यमापन केंद्राच्या कामकाजाकरिता नियुक्त शिक्षकांचे नियुक्ती आदेश प्राप्त होताच संबंधित शिक्षकांना नमूद कालावधीकरिता तात्काळ कार्यमुक्त करुन विनाविलंब कॅप सेंटरवर हजर राहण्याबाबत आदेशित करावे. कोणत्याही महाविद्यालयाने अशा नियुक्तीत परस्पर बदल अथवा संबंधित शिक्षकांना कार्यमुक्त न केल्यास प्रमादअंतर्गत सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

**१) मा.संचालक, सर्व संबंधित विद्याशाखानिहाय केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्र, हिवाळी सत्र परीक्षा २०२५.**
- आपणांस विनंती की, केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प केंद्राचे मुल्यांकनाचे कामकाज करण्यास नकार दिलेल्या व सदर कामकाजाकरिता हजर न झालेल्या शिक्षकांची माहिती नियुक्ती आदेशासह उपकुलसचिव, प्रमाणपत्र कक्ष, परीक्षा विभाग यांना प्रमाद समितीअंतर्गत पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी पाठविण्यात यावी.

**२) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.**

Scanned with OKEN Scanner